




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव


| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 45, 200/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 32, 005/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 18, 795/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 1, 05, 600/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ६१ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । ११/०३/२०२६ । पाने -४







# पुण्यातील व्यापाऱ्याचे अपहरण करणारी टोळी जेरबंद

## संगमनेरात दोन गावठी कट्टे, काडतुसे जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पिंपरी-चिंचवड येथील एका व्यापाऱ्याचे खंडणीसाठी अपहरण करून त्याला वाहनातून संगमनेरच्या दिशेने आणणाऱ्या पाच आरोपींना संगमनेर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने हिवरगाव पावसा टोलनाक्यावर सापळा रचून ताब्यात घेतले. या कारवाईत दोन गावठी बनावटीचे कट्टे, सहा जिवंत काडतुसे, पाच मोबाईल फोन तसेच गुन्ह्यात वापरलेली कार असा सुमारे ११ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दि. ९ मार्च रोजी अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे यांनी संगमनेर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना फोनद्वारे माहिती दिली की, पिंपरी-चिंचवड येथील एका व्यापाऱ्याचे अपहरण करून आरोपी काळ्या रंगाच्या स्विफ्ट युडीआय (युपी-७०-एचआर-९२७२) या कारमधून आळेफाटा मार्गे संगमनेरच्या दिशेने येत आहेत.

या माहितीच्या आधारे कुणाल सोनवणे यांनी तात्काळ पथकासह नाशिक पुणे महामार्गावरील हिवरगाव पावसा टोलनाका येथे नाकाबंदी केली. तसेच संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविण साळुंके यांना माहिती देऊन खांडगाव फाटा येथेही नाकाबंदी करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान पिंपरी-चिंचवड स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही आरोपींचा पाठलाग करत होते.

रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संशयित स्विफ्ट तउख कार टोलनाक्यावर येताच पोलिसांनी सापळा रचून वाहन थांबवले. वाहनाची तपासणी केली असता त्यात पाच संशयित आढळून आले. त्यांची झडती घेतली असता दोन गावठी कट्टे व सहा जिवंत काडतुसे तसेच मोबाईल फोन आढळून आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे- चंद्रशेखर दीपकचंद्र गौड (वय ३४), दिलीप मोहनलाल सरोज (वय २८), रिंकू अलगुराम सरोज (वय १७), अनिल गिरीधारीलाल सरोज (वय २६) मुकेशकुमार राममुदर चव्हाण (वय २४) हे सर्व आरोपी उत्तर प्रदेशातील प्रतापगड जिल्ह्यातील असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी पिंपरी-चिंचवड येथील काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०१/२०२६ नुसार बीएनएस कलम १४०(१), १४०(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पकडण्यात आलेल्या आरोपींना पुढील कारवाईसाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक प्रविण साळुंके तसेच पोलीस कर्मचारी बापुसाहेब हांडे, राहुल सारवंदे, सुनील ढाकणे, संतोष फड, शांताराम मालुजकर यांच्यासह इतर पोलिसांनी केली. या वेळी हिवरगाव पावसा टोलनाक्याचे व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनीही पोलिसांना सहकार्य केले.

# साठेबाजी रोखण्यासाठी सरकार सज्ज

## इंधन क्षेत्रात ‘एस्मा’ लागू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)



मध्य आशियातील वाढत्या तणावाचे पडसाद आता भारताच्या इंधन पुरवठ्यावर उमटू लागले आहेत. एलपीजी सिलिंडर आणि पेट्रोलियम उत्पादनांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी केंद्र सरकारने संपूर्ण देशात ‘एस्मा’ म्हणजेच ‘अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा’ लागू केला आहे. याचबरोबर युद्धजन्य परिस्थितीमुळे जेव्हा एखाद्या वस्तूचा पुरवठा विस्कळीत होतो, तेव्हा बाजारात त्या वस्तूची साठेबाजी आणि काळाबाजार वाढण्याची शक्यता असते. हे रोखण्यासाठी सरकार या कायद्याचा आधार घेते. या कायद्यामुळे इंधन पुरवठ्याशी संबंधित असलेले कर्मचारी आता कोणत्याही प्रकारचे आंदोलन किंवा संपावर जाऊ शकणार नाहीत. यामुळे गॅस आणि पेट्रोलचा पुरवठा विस्कळीत होणार नाही याची खात्री सरकारला करता येईल. सरकार कोणत्याही वस्तूचा साठा, वितरण आणि विक्रीवर मर्यादा घालू शकते. सध्या एलपीजी बाबत हेच घडत आहे. व्यापारी किंवा विक्रेते जास्त नफ्यासाठी गॅस सिलिंडरचा साठा करून ठेवू शकत नाहीत. तसे आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होतो. सरकार जीवनावश्यक वस्तूंची कमाल विक्री किंमत निश्चित करू शकते, जेणेकरून टंचाईच्या काळात ग्राहकांची लूट होणार नाही. अत्यावश्यक सेवांचा दर्जाएलपीजी वितरण, पेट्रोल पंप आणि तेल कंपन्यांच्या कामाला ‘अत्यावश्यक सेवा’ म्हणून घोषित करण्यात आले आहे. कामावर येण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर या कायद्यांतर्गत कठोर कारवाई किंवा अटक केली जाऊ शकते. युद्धामुळे कच्च्या तेलाची आवक कमी झाली असताना, देशांतर्गत उपलब्ध असलेल्या साठ्याचे वितरण समान पद्धतीने व्हावे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे.जनतेवर काय परिणाम होणार? सरकारने हा निर्णय सामान्य जनतेच्या सोयीसाठी घेतला आहे.


# हुंडाबंदी कायदा अधिक कठोर होणार - भोयर

## हुंडाबळी प्रकरणांवर विधानसभेत खळबळ

मुंबई (वृत्तसंस्था)

गेल्या काही वर्षांत राज्यात घडलेल्या हुंडाबळी प्रकरणांचा मुद्दा सोमवारी विधानसभेत चांगलाच गाजला. यावेळी लग्नाळू तरुणांना मुली मिळत नसल्याचा मुद्दाही चर्चेत आला. दरम्यान, सभागृहात आमदारांनी मांडलेल्या व्यथेसंदर्भात विचार करून हुंडाबळी कायदा अधिक कडक करण्यासंदर्भात विचार करण्याचे आश्वासन राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

काँग्रेस आमदार ज्योती गायकवाड यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हुंडाबळीच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्या म्हणाल्या की, अलीकडे हुंडाबळीच्या घटना वाढल्या असून पुरोगामी महाराष्ट्रात या घटना धक्कादायक आहेत. एनसीआरपीच्या अहवालानुसार, देशात प्रत्येक दिवशी २० मुलींचा हुंडाबळीमध्ये मृत्यू होतो. या प्रकरणातील मुलींसाठी मोफत वसतीगृह आणि शिक्षित मुलींसाठी नोकऱ्या तसेच अशिक्षित मुलींसाठी मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देणार का? हुंडाबळी प्रकरणात कठोर शिक्षा दिली जाणार का? असा प्रश्न त्यांनी विचारला. विधानसभा सदस्य नमिता मुंदडा, स्नेहा दुबे, प्रकाश सोळंके विक्रम पाचपूते, डॉ. नितीन राऊत यांनी या चर्चेत सहभाग घेतला.




यावर उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, केंद्र शासनाच्या हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१ च्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यात महिला व बालविकास विभागाच्या ३ नोव्हेंबर २००३ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र हुंडा प्रतिबंधित नियम २००३ तयार करण्यात आला. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुका स्तरावर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी अपर पोलिस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंधक हा स्वतंत्र विभाग तयार करण्यात आला आहे. गृहविभागाच्या वतीने महिला हेल्पलाईन, भरोसा सेल, महिला दक्षता समिती, स्वतंत्र पोलिस तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

# तेल पुरवठा रोखला तर 20 पट हल्ला - ट्रम्पंचा इशारा

## इराण युद्धाचा ११ वा दिवस

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचा ११ वा दिवस आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सोमवारी रात्री इराणवर मोठ्या हल्ल्याची धमकी दिली आहे. ते म्हणाले की, जर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये तेलाचा पुरवठा थांबवण्याचा प्रयत्न केला तर अमेरिका त्याच्यावर २० पट अधिक ताकदीने हल्ला करेल. शत्रू पूर्णपणे नष्ट होईपर्यंत हे युद्ध सुरू राहील.

ट्रम्प यांनी हे देखील सांगितले की, युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका आणि इस्त्रायलने मिळून इराणमधील आतापर्यंत ५,००० हून अधिक ठिकाणांवर हल्ला केला आहे. ते म्हणाले की, काही अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणांना अजून जाणूनबुजून लक्ष्य करण्यात आलेले नाही, जेणेकरून गरज पडल्यास नंतर कारवाई करता येईल.

फ्लोरिडाच्या डोरल शहरात पत्रकार परिषदेदरम्यान ट्रम्प म्हणाले की, अमेरिका आणि इस्त्रायलने या युद्धात बरीच मोठी आघाडी घेतली आहे आणि कदाचित हे युद्ध लवकरच संपेल, परंतु सध्या लष्करी कारवाई सुरूच राहील.इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धादरम्यान, ट्रम्प यांनी ऑस्ट्रेलियाला आवाहन केले आहे की, त्यांनी इराणच्या महिला फुटबॉल खेळाडूंना आश्रय द्यावा. ट्रम्प म्हणाले की, जर त्यांना इराणमध्ये परत पाठवले गेले, तर त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो आणि ही एक मोठी मानवी चूक ठरेल.

ही घटना ऑस्ट्रेलियामध्ये सुरू असलेल्या महिला आशियाई कपदरम्यान समोर आली. खरं तर, २८ फेब्रुवारी रोजी इराणवर झालेल्या हल्ल्यानंतर महिला संघाने राष्ट्रगीत गायले नव्हते, ज्याला सरकारविरोधी निषेध म्हणून पाहिले गेले. यानंतर, इराणी माध्यमांमध्ये खेळाडूंना 'देशद्रोही' म्हटले गेले आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करून सांगितले की, जर या खेळाडूंना इराणमध्ये पाठवले गेले तर त्यांना गंभीर शिक्षेला सामोरे जावे लागेल किंवा त्यांचा जीवही जाऊ शकतो. ट्रम्प म्हणाले की, जर ऑस्ट्रेलिया खेळाडूंना आश्रय देण्यासाठी तयार नसेल, तर अमेरिका त्यांना आश्रय देण्यासाठी तयार आहे.ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्याने इराणचे सुमारे ८०% क्षेपणास्त्र प्रक्षेपक आणि तळ नष्ट केले आहेत आणि इराणकडे आता खूप कमी प्रक्षेपक शिल्लक आहेत. त्यांनी अमेरिकन सैन्याने केलेल्या कामाचे वर्णन अत्यंत प्रभावी असे केले. ट्रम्प म्हणाले की अमेरिकेने इराणी ड्रोन उत्पादन सुविधांवरही हल्ला केला. त्यांनी सांगितले की या हल्ल्यांमुळे इराणच्या ड्रोन क्षमतेचे मोठे नुकसान झाले. ट्रम्प यांनी दावा केला की या कारवाईत इराणी नौदलाचेही मोठे नुकसान झाले. त्यांनी सांगितले की ४६ जहाजे बुडाली आणि आता ती समुद्रात आहेत.

त्यांनी गमतीने टिप्पणी केली की त्यांनी अधिकाऱ्यांना जहाजांच्या गुणवत्तेबद्दल विचारले. जेव्हा त्यांना सांगितले की ते खूप चांगले आहेत, तेव्हा त्यांनी विचारले की ते का पकडले गेले नाहीत. अधिकाऱ्यांनी उत्तर दिले की त्यांना बुडवणे अधिक सुरक्षित असेल. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी सोमवारी सांगितले की इराण युद्ध लवकरच संपू शकते. त्यांच्या विधानाचा जागतिक बाजारपेठेवर सकारात्मक परिणाम झाला. मंगळवारी सकाळी आशियामध्ये व्यापार सुरू होताच तेलाच्या किमती घसरल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती सुमारे ८.५% ने घसरून प्रति बॅरल ९२.५० डॉलरवर आल्या. अमेरिकेत व्यापार होणारे तेल देखील सुमारे ९% ने घसरून प्रति बॅरल ८८.६० डॉलरवर आले.









# राज्यसभा निवडणुकीत २६ बिनविरोध

मुंबई (वृत्तसंस्था)


दहा राज्यांमधील ३७ जागांसाठी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीत सात राज्यांतील २६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. अनेक राज्यांमध्ये विरोधी पक्षांनी उमेदवार उभे न केल्यामुळे या उमेदवारांना मतदानाशिवायच राज्यसभेत प्रवेश मिळाला आहे. या बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेसचे वरिष्ठ नेते अभिषेक मनु सिंघवी आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांसारख्या प्रमुख नावांचा समावेश आहे.

दरम्यान, बिहार, ओडिशा आणि हरियाणा या तीन राज्यांतील एकूण ११ जागांसाठी मात्र निवडणूक होणार आहे. या राज्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त उमेदवार रिंगणात असल्याने मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. महाराष्ट्रातील सातही जागांसाठी उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस), रामदास आठवले (आरपीआय-आठवले), विनोद तावडे (भाजप), रामराव वडकुते (भाजप), माया इवनाते (भाजप), ज्योती वाघमारे (शिवसेना-शिंदे गट) आणि पार्थ पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) यांचा समावेश आहे. तमिळनाडूमधून सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले असून त्यात तिरुची शिवा आणि जे. कॉन्स्टंटाईन रविंद्रन (द्रमुक), एम. थंबीदुरई (अण्णा द्रमुक), अंबुमणी रामदास (पाट्टाली मक्कल काची), एम. ख्रिस्तोफर टिळक (काँग्रेस) आणि एल. के. सुधीश (देसिया मुरपोक्कू द्रविड कळघम) यांचा समावेश आहे. पश्चिम बंगालमधील पाच जागांवर राहुल सिन्हा (भाजप), बाबुल सुप्रियो, राजीव कुमार, मेनका गुरुस्वामी आणि कोएल मलिक (तृणमूल काँग्रेस) बिनविरोध निवडून आले आहेत. आसाममधून जोगेन मोहन आणि तेरोस गोवाला (भाजप) तसेच प्रमोद बोरो (युनायटेड पीपल्स पार्टी लिबरल) निवडून आले आहेत. तेलंगणामधून अभिषेक मनु सिंघवी आणि वेम नरेंद्र रेड्डी (काँग्रेस) यांची निवड झाली आहे. छत्तीसगडमध्ये लक्ष्मी वर्मा (भाजप) आणि फूलो देवी नेताम (काँग्रेस) तर हिमाचल प्रदेशमधून अनुराग शर्मा (काँग्रेस) यांची बिनविरोध निवड झाली आहे.

# संपादकीय...

## अमेरिकेची विस्तारवादी धोरणे धोकादायक !

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची दादागिरी दिवसेंदिवस वाढत चालली असल्याचे जगातील अनेक देशांचे मत आहे. अमेरिका ही महासत्ता असल्यामुळे तिच्या राजकीय, आर्थिक आणि लष्करी ताकदीचा प्रभाव जगभर पडतो. मात्र ही ताकद इतर देशांवर दबाव टाकण्यासाठी वापरली जात असल्याचा आरोप वेळोवेळी केला जात आहे. तेलसंपन्न आणि सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या देशांमध्ये हस्तक्षेप करून त्या देशांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न अमेरिकेने अनेकदा केला आहे, असे अनेक आंतरराष्ट्रीय विश्लेषकांचे मत आहे. व्हेनेझुएला या लॅटिन अमेरिकेतील छोट्याशा पण तेलसंपन्न देशाबाबत अमेरिकेने घेतलेली भूमिका याचे एक उदाहरण मानले जाते. त्या देशातील राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने तेथील सत्ताधाऱ्यांवर दबाव टाकला. अमेरिकेने त्या देशाच्या राजकीय परिस्थितीत थेट हस्तक्षेप करून तेथील नेतृत्वाला आव्हान दिले आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठा वाद निर्माण झाला. तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळवण्याच्या प्रयत्नांमुळेच हा हस्तक्षेप झाला, असा आरोप अनेक देशांनी केला. यानंतर अमेरिकेचे लक्ष इराणकडे वळले. मध्यपूर्वेतील या महत्त्वाच्या देशाबाबत अमेरिकेची धोरणे आधीपासूनच कठोर राहिली आहेत. इराणच्या अणु कार्यक्रमावरून अमेरिका आणि इराण यांच्यात दीर्घकाळ तणाव निर्माण झाला. इराणमधील अंतर्गत आंदोलनांना अमेरिकेने समर्थन दिल्याचा आरोपही तेथील सत्ताधाऱ्यांनी केला. या सर्व घडामोडींमुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढत गेला. जगातील अनेक देश या परिस्थितीकडे चिंतेने पाहत असतानाच आता अमेरिकेचे लक्ष क्युबा या छोट्याशा देशाकडे वळल्याची चर्चा सुरू झाली आहे. व्हेनेझुएला आणि इराणनंतर पुढील लक्ष्य कोण, असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्याचे उत्तर स्वतः डोनाल्ड ट्रम्प यांनी एका लॅटिन अमेरिकन नेत्यांच्या कार्यक्रमात दिल्याचे सांगितले जाते. या कार्यक्रमात बोलताना ट्रम्प यांनी क्युबातील कम्युनिस्ट सरकारवर टीका करत तेथील जनतेला सरकार उलथवून टाकण्याचे आवाहन केले. क्युबाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची वेळ आली आहे, असे विधान त्यांनी केले. अन्यथा अमेरिकेच्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे क्युबामध्ये आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. क्युबाच्या नेतृत्वाने या इशाऱ्याचा कठोर शब्दांत निषेध केला आणि अमेरिकेच्या संभाव्य आक्रमणाला तोंड देण्यासाठी आपली लष्करी सज्जता वाढवण्याची घोषणा केली. लहान देशांवर दबाव टाकून त्यांची राजकीय व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न हा आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या विरोधात असल्याचे मत अनेक देशांनी व्यक्त केले आहे. क्युबाबरोबरच काही दिवसांपूर्वी ग्रीनलँड या छोट्याशा प्रदेशाबाबतही ट्रम्प यांनी वादग्रस्त भूमिका घेतली होती. ग्रीनलँडने अमेरिकेत विलीन व्हावे, अशी मागणी त्यांनी केली होती. तसे झाले नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या प्रदेशावर ताबा मिळवेल, असा इशाराही त्यांनी दिला होता. इतकेच नव्हे तर ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या देशांवर आयात शुल्क, म्हणजेच टेरिफ वाढवण्याची धमकीही अमेरिकेकडून देण्यात आली होती. यामुळे युरोपातील अनेक देशांमध्ये संतापाची लाट उसळली. डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन तसेच इतर शहरांमध्ये हजारो नागरिक रस्त्यावर उतरले आणि ग्रीनलँड हा विकाऊ प्रदेश नाही, अशा घोषणा देत आंदोलन केले. इंग्लंड, फ्रान्स आणि इतर युरोपीय देशांनीही अमेरिकेच्या या धोरणावर टीका केली. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये दादागिरी थांबवावी, असे मत या देशांनी व्यक्त केले. अमेरिकेच्या या धोरणामुळे केवळ युरोपातच नव्हे तर जगभरात अस्वस्थता वाढत आहे. दक्षिण अमेरिकेतील अनेक देशही ट्रम्प यांच्या विस्तारवादी धोरणावर नाराज असल्याचे संकेत दिसत आहेत. जरी या देशांनी उघडपणे टीका केली नसली तरी त्यांच्या राजकीय भूमिकेतून नाराजी स्पष्ट होत आहे. अमेरिकेतील काही नागरिकांनाही ट्रम्प यांची ही भूमिका मान्य नसल्याचे दिसून येते. ट्रम्प यांचे धोरण स्पष्ट आहे, असे अनेक विश्लेषकांचे मत आहे. आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांवर प्रभाव वाढवणे, तेलसंपन्न राष्ट्रांवर नियंत्रण मिळवणे, तसेच जे देश अमेरिकेच्या धोरणांना विरोध करतील त्यांच्यावर आयात शुल्काच्या माध्यमातून दबाव आणणे, हा त्यांचा दृष्टिकोन असल्याचे म्हटले जाते. या विस्तारवादी धोरणामुळे जगात अस्थिरता वाढत असून युद्धाचा धोका निर्माण होत आहे.

CorelDRAW
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Ps Ai Id

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

## आनंदगड शैक्षणिक संकुलामध्ये महिलांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन

**अकोले**

**(युवावार्ता प्रतिनिधी)–** कोणालाही कायद्याचे अज्ञान माफ केले जात नाही, त्यामुळे सर्वांना कायद्याचे जुजबी ज्ञान माहीत असणे गरजेचे आहे. तसेच मुलींना गुड टच, बॅड टच हे समजणे गरजेचे असून त्यामुळे पुढील अनर्थ टाळणे शक्य होईल, असे प्रतिपादन जेष्ठ विधिज्ञ मंगलाताई हांडे यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत आनंदगड शैक्षणिक संकुलामध्ये आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, विरगाव आणि मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी, विरगावच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी कायदेविषयक मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या मध्ये विद्यार्थी, सुरक्षा, संरक्षण, मानसिक आरोग्य धोरण या विषयावर जेष्ठ विधिज्ञ मंगल हांडे यांनी मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते, तर व्यासपीठावर जेष्ठ विधिज्ञ मंगलताई हांडे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी सेक्रेटरी तथा खजिनदार ॲड. के. बी. हांडे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष जे. डी. आंबरे पा., नवरदेव चित्रपटाचे दिग्दर्शक, निर्माते, नायक निरंजन देशमुख, ग्रामसेविका नेहे मॅडम, डॉ. छाया वैद्य, माने मॅडम, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सुप्रिया वाकचौरे, गिता रहाणे, प्रतिक्षा रहाणे, सानिका वाकचौरे, शिवराज वाकचौरे, को-ऑर्डीनेटर विद्याचंद्र सातपुते, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्राचार्य मिलिंद सुर्वे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

यावेळी जेष्ठ विधिज्ञ मंगल हांडे यांनी पुढे मार्गदर्शन करताना पोक्सो कायदा समजावून सांगताना १८ वर्षे वयोगटाखालील मुलांमुलींना हा कायदा लागू असून लैंगिक अत्याचार, अश्लिल हावभाव, गुड टच, बॅड टच असे विविध उदा. देऊन माहिती दिली. आपल्याला होणारा त्रास हा तातडीने पालकांना, शिक्षकांना सांगावा, त्यामुळे पुढील निर्माण होणारे प्रश्न थांबविणे शक्य होतील. यावेळी त्यांनी बाल विवाह कायदा समजावून सांगितला. कायदा समजावून घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असून त्याप्रमाणे आपण वागणे गरजेचे आहे. जनरल सेन्स वापरणे म्हणजे कायद्याचे पालन करणे होय, असे मत व्यक्त केले. महिलांनी स्वतःचा आत्मविश्वास वाढविणे गरजेचे असून महिलांनी निर्भय राहिले पाहिजे व स्व संरक्षणासाठी तयार राहिले पाहिजे. आपण स्त्री स्वातंत्र्य बद्दल बोलतो, परंतु स्त्रियांना खऱ्या अर्थाने सुरक्षितता व स्वातंत्र्य मिळाले का, असा सवाल करीत समाजाने स्त्रियांना हक्काचे संरक्षण व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. यावेळी ॲड. के. बी. हांडे व संस्थेचे सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सूत्रसंचालन प्रा. प्रिया वाघ यांनी केले, स्वागत व प्रास्ताविक विद्याचंद्र सातपुते, आभार प्रा. प्राजक्ता आंबरे यांनी मानले.

## संगमनेर येथील अध्यापक विद्यालय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत विजयी

**संगमनेर**

**(युवावार्ता प्रतिनिधी)–** शिक्षण प्रसारक संस्थेच्या अध्यापक विद्यालयाने अहिल्यानगर येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यश संपादन केले आहे. डॉ. ना. जे. पाऊलबद्धे अध्यापक विद्यालय येथे नुकतेच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत संगमनेर येथील अध्यापक विद्यालयातील थाळीफेक स्पर्धेत कुमारी वैष्णवी लकारे हिने प्रथम क्रमांक व कुमार गौरव भांगरे याने तृतीय क्रमांक संपादन केला आहे. तर १०० मीटर धावणे यात कुमारी सोनाली जाधव हिने द्वितीय क्रमांक संपादन केला. तर ४०० मीटर रिले यामध्ये मुलींनी प्रथम क्रमांकाने सांघिक विजय संपादन केला आहे. सांस्कृतिक स्पर्धेत कुमारी वैष्णवी लकारे हिने द्वितीय क्रमांक संपादन केला आहे. स्पर्धेमध्ये एकूण विद्यालय कडून ३० विद्यार्थी सहभागासाठी पात्र ठरले होते.

व्यक्तिमत्व विकासासाठी क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असल्याने जिल्हास्तरावरील या उपक्रमातून उत्तम खेळाडू व सांस्कृतिक स्पर्धेतून उत्तम दृष्टकोन निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे मनोगत प्राचार्या सविता घुले यांनी व्यक्त केले. या स्पर्धेसाठी क्रीडाशिक्षक क्रीडा विभाग प्रमुख प्रा. आकाश लकारे, प्रा. चंद्रकला सापनर, प्रा. भोकनळ कविता, प्रा. सीमा कासार, प्रा. प्रणित धिवर यांचे मार्गदर्शन लाभले. या विजयासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव अनिल राठी, संस्थेचे शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र लड्डा यांनी अभिनंदन केले आहे.

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**पाहिजेत**
अकाउंटंट (महिला/ पुरुष)
अनुभवास प्राधान्य
पत्ता- अकोले बायपास रोड, संगमनेर
8308111211

**पाहिजेत**
ऑफिसबॉय (शिपाई) ०१ जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता– १०/१२ वी पास
वयमर्यादा– २० ते ४० वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दि. १२/०३/२०२६ पर्यंत जमा करावे
संपर्क– महेश नागरी सहाकरी पतसंस्था मर्या. संगमनेर, अशोक चौक, संगमनेर फोन– ०२४२५–२२०७७७
email- mahesh.patsanstha@gmail.com

**पाहिजेत**
स्कुप अँड जॉय या नामांकित कुल्फी ब्रँडसाठी खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्सिक्युटिव्ह (४ जागा)
हिंगे मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट्स प्रा. लि. संगमनेर
9112069393

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही. अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397




卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

We treat He cure's
**धन्वंतरी** मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत **पाहिजेत**
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील **जागा भरणे आहे**
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

**पाहिजेत** सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन – २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता– प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन / कॅशियर / स्टोअर मॅनेजर / फ्लोअर मॅनेजर / हेल्पर / सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ / १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१ — ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१ — टॅलीचे ज्ञान आवश्यक, किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२
सेल्यमन – ०२
ड्रायव्हर – ०२
दुकान काम व शोरुमसाठी – ०२ जागा
महिला कामगार – ०२
9822097904

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी













## अकोले मेडिकल फाउंडेशनमध्ये महिला दिनानिमित्त सन्मान



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने हॉस्पिटलमधील महिला कर्मचारी तसेच महिला रुग्णांचा विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांनी उपस्थित महिलांचा सत्कार करून त्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे हॉस्पिटलमधील महिला कर्मचारी व महिला रुग्णांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अकोले मेडिकल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत महिलांच्या सन्मानाची परंपरा कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटमध्ये महिला दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये रंगोली स्पर्धा, भाषण स्पर्धा, आरोग्य जनजागृती उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश होता. कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थिनींना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय लोखंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विजयाताई बारसे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल लुंकड, ओम लगड, वैष्णवी सालालकर, वैभवी पेंढारकर, शाहिस्ता शेख आदींनी अथक परिश्रम घेतले.

## जागतिक महिला दिनानिमित्त १५ लाख मुलींना आत्मरक्षण आणि योगाचे धडे



**जळगाव (युवावार्ता प्रतिनिधी)–**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद मंडळ (एमपीएसपी) आणि नामदार दादासाहेब भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षण प्रशिक्षण' कार्यक्रमांतर्गत आज एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रभरातील सुमारे २२ हजार शाळांमधील १५ लाख मुलींना प्रशिक्षित करून विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आज दिनांक ८ मार्च रोजी, अहिल्यानगर येथील जि. प. प्रा. शाळा मराठी, जि. प. प्रा. शाळा उर्दू गणेशनगर, जि. प. प्रा. शाळा एकरूखे, या मोहिमेचा उत्साह पाहायला मिळाला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या शाळेतील विद्यार्थिनींना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणातील महत्त्वाचे पैलू : मुलींना संकटकाळी स्वतःचे रक्षण करण्यासाठी कराटेचे मूलभूत तंत्र आणि डावपेच शिकवण्यात आले. शारीरिक सुदृढता आणि मानसिक एकाग्रतेसाठी योगाचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. केवळ शारीरिकच नव्हे, तर समाजात वावरताना सतर्क कसे राहावे आणि आत्मविश्वासाने कसे वागावे, याचे विशेष 'सोशल अवेकनिंग' सत्र राबवण्यात आले.

आमच्या मुलींचे सशक्तीकरण आणि सुरक्षा हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र संपूर्ण देशासमोर सुरक्षिततेचा एक नवा आदर्श उभा करेल, असा विश्वास मंत्री दादासाहेब भुसे यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ५७५ जिल्हा परिषद शाळांसह राज्यातील हजारो शाळांमध्ये हे प्रशिक्षण एकाच वेळी राबवले जात आहे. मुलींना स्वसंरक्षणास सक्षम करून त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे हे जिवंत उदाहरण ठरत आहे.

## महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक २०२६ मंजूर

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील मुद्रांक शुल्क विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी तसेच, प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले 'महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक २०२६' विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले. स्थानिक स्तरावरील अधिकाऱ्यांच्या आर्थिक अधिकारात मोठी वाढ करण्यात आल्याने मुद्रांक शुल्काशी संबंधित प्रकरणांच्या निर्णयासाठी आता नोंदणी महानिरीक्षक स्तरावर



जाण्याची गरज पडणार नाही.

सध्याच्या कायद्यातील कलम ५२ 'अ' मध्ये सुधारणा करून प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे नोंदणी महानिरीक्षकांकडे येणारा कामाचा ताण कमी होऊन स्थानिक स्तरावरच निर्णय होतीलविधेयकावर बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सध्या अनेक केसेस केवळ आर्थिक मर्यादा कमी असल्यामुळे राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांकडे प्रलंबित राहतात. यामुळे नागरिकांना मुंबईला चकरा माराव्या लागतात आणि मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. आता जिल्हाधिकारी आणि उपमहानिरीक्षक स्तरावरच मोठ्या रकमेच्या प्रकरणांचा निकाल लावता येईल. यामुळे पारदर्शकता येईल आणि प्रलंबित कामांचा डोंगर लवकर उपसला जाईल.

# अंभोरे-ओझर येथील आदिवासी बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

## जागतिक महिला दिनी आमदार अमोल खताळांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर तालुक्यातील अंभोरे आणि ओझर येथील सुमारे ३५ ते ४० आदिवासी बंधू-भगिनींनी जागतिक महिला दिनाच्या दिवशी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना महायुतीचा भगवा हातात घेत शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशामुळे तालुक्यात आमदार खताळ यांची ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. अंभोरे येथील आदिवासी समाज हा यापूर्वी काँग्रेस पक्षाशी जोडलेला होता. मात्र माजी लोकप्रतिनिधींविषयी नाराजी व्यक्त करत या समाजातील कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शिवसेना महायुतीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

सुरजित खेमनर, कोंडाजी कडनर, संतोष बलसाने, मंजाबापू साळवे आणि राम बर्डे यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्मण जाधव, म्हातारबा बर्डे, भीमा बर्डे, शिवराम उघडे, जालिंदर मोटे, सुदाम माळी, नारायण गायकवाड, नामदेव बर्डे, विशाल गायकवाड, बाळासाहेब बर्डे, काका गवारी, मच्छिंद्र माळी, गणेश कऱ्हाटे, कारभारी पिंपळे, सोपान गायकवाड, रावसाहेब पिंपळे, आप्पा पवार, विठ्ठल माळी, कृष्णा बर्डे, विजय मोटे, श्याम पिंपळे, नारायण गायकवाड, बाळू बर्डे, बाळासाहेब मोटे यांच्यासह लता पवार, ताराबाई बर्डे, अनिता बर्डे, सुनीता माळी, मथुरा गायकवाड, सुमन बर्डे, मंगल पिंपळे, तुळसाबाई जाधव, लता पिंपळे, गंगुबाई पवार, जनाबाई माळी, कांता गायकवाड, ताई कऱ्हाटे, मंगल मोटे, मीना पवार आणि आशा पवार या महिलांनी शिवसेना महायुतीमध्ये प्रवेश केला.

यावेळी शिवसेना महिला उपजिल्हा प्रमुख दिपाली वाव्हळ यांच्या हस्ते महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच पुरुष कार्यकर्त्यांचा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते भगवी शाल घालून सन्मान करण्यात आला. या प्रसंगी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तुमच्या सारख्या सर्वसामान्य जनतेच्या प्रेमामुळेच मला या मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे तुमच्या ज्या काही अडचणी किंवा समस्या असतील त्या आपल्या कार्यालयात मोकळेपणाने मांडाव्यात. त्या सोडविण्यासाठी आपण नक्की प्रयत्न करू. तसेच शासनाच्या अनेक लोककल्याणकारी योजना आहेत. त्या प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

– अमोल खताळ (आमदार)

**येथून मागे आमचा फक्त मतासाठीच वापर – लक्ष्मण जाधव**

आतापर्यंत आमच्या आदिवासी समाज बांधवांचा फक्त मतदानासाठीच वापर झाला. निवडून आल्यानंतर पाच वर्षे आमच्या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही. आमचे प्रश्न फक्त शिवसेना महायुतीचे सरकारच सोडवू शकते, या विश्वासाने आम्ही सर्वजण शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे.

लक्ष्मण जाधव, आदिवासी नेते

## राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शनात लोकपंचायत आर.टी.टी.आय चा प्रकल्प प्रथम



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

छत्रपती संभाजीनगर येथील MIT कॅम्पसवर ५ ते ८ मार्च २०२६ दरम्यान आयोजित DIPEX-२०२६ या राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शन-स्पर्धेत लोकपंचायत ग्रामीण तंत्र शिक्षण संस्था, कुरकुंडी (ता. संगमनेर) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

महाराष्ट्र राज्य नवोपक्रम संस्था, कौशल्य विकास विभाग, तंत्रशिक्षण संचालनालय (डीटीई), महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई) तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या सहकार्याने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात महाराष्ट्र व गोवा राज्यातील अभियांत्रिकी पदविका, पदवी, आयटीआय तसेच कृषी महाविद्यालयांमधील सुमारे २०० हून अधिक कार्यरत प्रकल्प सादर करण्यात आले होते.

या स्पर्धेत लोकपंचायत रूरल टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सोलर पावर सायकल फवारणी यंत्र या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. विजेत्या संघाला ट्रॉफी, प्रमाणपत्रे तसेच ११,००० रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रदर्शनाच्या पारितोषिक वितरण समारंभाला महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या संघाला पारितोषिक प्रदान करण्यात आले.

सदर प्रकल्पामध्ये सौरऊर्जेवर चालणारी फवारणी प्रणाली विकसित करण्यात आली असून, सायकलला बसविलेल्या सोलर पॅनेल, बॅटरी व डीसी पंपाच्या साहाय्याने फवारणी यंत्र कार्य करते. त्यामुळे शेतकऱ्यांचा श्रम व खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळू शकते. या प्रकल्पाने यापूर्वी तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, GMRT वेधशाळा, खोडद येथे आयोजित टेक्निकल सायन्स प्रदर्शनातही प्रथम क्रमांक पटकावला होता.

या प्रकल्पासाठी दर्शन गडाख व सार्थक मंडलिक या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली असून, त्यांना गाडे सर व मोरे सर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## विखे पाटील फाउंडेशनचे दिव्यांगांसाठी कार्य अतुलनीय : सुनीता भांगरे



**अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)–**

दिव्यांगांच्या चेहऱ्यावर निर्माण होणारा आनंद खूप महत्त्वाचा असून, तो निर्माण करण्याचे काम विखे पाटील फाउंडेशनने केले आहे. हे कार्य अतुलनीय आहे, असे मत अगस्ती साखर कारखान्याच्या व्हा. चेअरमन सुनीताताई भांगरे यांनी व्यक्त केले. अकोले येथे अगस्ती विद्यालयात दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत सहाय्यक साधनांच्या तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी अकोले एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त गिरजा जाधव, अगस्ती शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष सतिश नाईकवाडी, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, सोनाली नाईकवाडी, अमृतसागर दूध संघाचे व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, उपनगराध्यक्ष शरद नवले, अकोले एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सुधाकर देशमुख, रेश्मा गोडसे, आनंदराव वाकचौरे, खंडू वाकचौरे आदी उपस्थित होते.

सोनाली नाईकवाडी यांनी अकोले तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत आवश्यक सहाय्यक उपकरणे पोहोचवून त्यांचे जीवन सुलभ बनविण्याचे काम ना. राधाकृष्ण विखे व मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी केले आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विखे पाटील फाउंडेशनचे विकास वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कोकणे यांनी तर आभार भाऊसाहेब वाकचौरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनील गमे, संतोष कोकणे, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अनाप, राजाराम वाकचौरे, भाजयुमोचे जिल्हा सचिव सुशांत वाकचौरे, दिव्यांग सेलचे बाळासाहेब धुमाळ, संतोष वाकचौरे यांनी विशेष सहकार्य केले.

## शिवजयंती निमित्त अकोलेत ऐतिहासिक प्रसंगांचे नृत्यमय सादरीकरण

**अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)–**

रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या शिवजयंतीनिमित्त अकोल्यातील विविध शाळांमधील मुलांनी शिवरायांच्या जीवनातील जन्मापासून ते त्यांच्या राज्याभिषेकापर्यंतचे विविध प्रसंग तसेच त्यांचा पराक्रम व शौर्य दर्शविणाऱ्या विविध ऐतिहासिक घटना अंगावर रोमांच उभे करणाऱ्या प्रसंगांच्या माध्यमातून भव्य रंगमंचावर नृत्य-नाट्य स्वरूपात सादर केल्या. शिवजयंती निमित्त रोटरी क्लब अकोलेने शालेय विद्यार्थ्यांसाठी समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ०८ शाळा सहभागी झाल्या होत्या. स्वाभिमान, शौर्य आणि पराक्रम यांचे प्रतीक असणाऱ्या शिवछत्रपतींच्या चरणी नृत्यरूपाने सादर केलेली अभिव्यक्ती सर्वांच्या मनाला स्पर्शून गेली.



ओघवत्या शब्दांमधील भावपूर्ण निवेदन, पाळणा गीतापासून भवानी मातेच्या गोंधळ गीतापर्यंतच्या विविध जोषपूर्ण गीतांच्या साथीने महाराजांचे बालपण ते पावनखिंडीची लढाई आणि औरंगजेबाचा वध अशा दृश्यांचे नृत्यमय सादरीकरण, राज्याभिषेकाचा उत्साह, आरती, अंगावर शहारे आणणारा पोवाडा, लाठी-काठीचे थरारक प्रसंग तसेच शिवकन्या ग्रुपचे लेझीम पथक या सर्वांमुळे उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. अकोलेकरांनीही बक्षिसरूपाने भरभरून दाद दिली.

रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून केले. परीक्षक म्हणून संगमनेरच्या निरिजा बापट-कुलकर्णी आणि ऋषिकेश देशमुख यांनी अतिशय पारदर्शी पद्धतीने परीक्षण करून निकाल घोषित केले. त्यांच्या कामगिरीचे अकोलेकरांनी कौतुक केले. यावेळी आ. डॉ. किरण लहामटे आणि पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी आ. लहामटे म्हणाले की, रोटरी क्लब अकोले सेंट्रलने नेहमीच उत्कृष्ट सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य क्षेत्रात भरीव उपक्रम राबविले असून त्यांचे अकोले तालुक्याच्या विकासात मोठे योगदान आहे. त्यांच्या या कार्यात आपण सर्व अकोलेकर सहभागी होऊ, असे आवाहन त्यांनी केले. तसेच रोटरी क्लबने फोपसंडी गाव दत्तक घेऊन त्या गावाचा विकास करावा, असे आवाहन केले. ही शिवजयंती स्मरणात राहणारी असून पुढेही शिवजयंती उत्सव सुरू ठेवावा, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. हेमंत मंडलिक यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर....................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# एकविरा महिला क्रीडा महोत्सवात ५६७४ महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण भागातील महिला सहसा चूल आणि मूल व शेती यामध्ये रमलेल्या असतात. या महिलांना आरोग्य, आहार आणि व्यायामाचे महत्त्व सांगण्याबरोबर लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या क्रीडा गुणांना व्यासपीठ निर्माण करून देणाऱ्या एकविरा फाउंडेशनच्या वतीने आयोजित महिला क्रीडा महोत्सवात क्रिकेटसाठी १६० संघ रस्सीखेचसाठी २५२ संघ तर बॅडमिंटनसाठी ३२७ महिला संघांचा सहभाग झाल्याने या स्पर्धा अत्यंत रोमांचकारी वळणावर पोहोचल्या आहे. खेड्यात राहणाऱ्या महिलांची क्रिकेट मैदानावर बॅट घेऊन होणारी फटकेबाजी पाहण्यासाठी हजारो महिला प्रेक्षकांची उपस्थितीही लावत आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून मागील चार वर्षापासून भव्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन होत आहे. यावर्षी महिला दिनाच्या निमित्ताने या स्पर्धा सुरू झाली असून महिलांच्या वाढत्या सहभागामुळे दोन दिवस स्पर्धा वाढवण्यात आले आहेत. यामध्ये क्रिकेटसाठी १६० महिला संघांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये २४०० महिला खेळणार आहे तर रस्सीखेच साठी २५२ महिला संघांचा सहभाग असून यामध्ये २५२० तर बॅडमिंटन स्पर्धेसाठी दुहेरी मध्ये ३२७ संघांची नोंद झाली आहे. यामधून ७५४ अशा एकूण ५६७४ महिला खेळाडू प्रत्यक्ष मैदानात खेळण्यासाठी उतरत आहेत.

शेतीत रमणाऱ्या या महिला क्रिकेटच्या मैदानावर हातात बॅट घेऊन जोरदार फटकेबाजी करत आहेत.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्यावतीने महिला सबलीकरणाचे कार्य हाती घेण्यात आले असून महिलांचे आरोग्य व आहाराबाबत सातत्याने जनजागृती केली जात आहे. हजारो महिलांचे सामने पाहण्यासाठी असणारी उपस्थिती आयोजकांकडून अत्यंत अचूक केलेले नियोजन, प्रेक्षक गॅलरी, हिरवळीवर महिलांसाठी खेळण्याची संधी, आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रसन्न वातावरण हे या स्पर्धेचे वैशिष्ट्ये ठरले आहे. महिलांच्या दिवसेंदिवस वाढत्या सहभागामुळे पाच दिवसा ऐवजी स्पर्धा आता सात दिवसांची करण्यात आली आहे.

# ऋतुजा गायकवाड व धनंजय दिघे यांचा आ. खताळांच्या हस्ते सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) स्पर्धा परीक्षेत यश संपादन करत संगमनेर तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या विद्यार्थ्यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले.

तालुक्यातील नान्नज दुमाला येथील ऋतुजा अशोक गायकवाड हिने केंद्रीय नागरी सेवा परीक्षेत देशात १०६ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे तिची जिल्हाधिकारी पदासाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेत कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर ऋतुजाने मिळवलेले हे यश तालुक्यासाठी अभिमानास्पद मानले जात आहे.

तर जोर्वे येथील धनंजय संजय दिघे यांनी देखील केंद्रीय नागरी सेवा परीक्षेत ऑल इंडिया रँक ५२९ मिळवत यश मिळवले आहे. या यशामुळे त्यांची भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) पदासाठी निवड झाली आहे. अत्यंत स्पर्धात्मक आणि कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

दरम्यान, या दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन आमदार खताळ यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या कष्टाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, नातेवाईक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऋतुजा गायकवाड आणि धनंजय दिघे यांच्या यशामुळे संपूर्ण संगमनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही स्पर्धा परीक्षांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# अकोले तालुक्यातील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. बी. जी. बंगाळ यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी विश्वस्त डॉ. बी. जी. बंगाळ ( वय ९३ ,मूळ रा. मेंहेंदूरी हल्ली गुजरी बाजार, अकोले ) यांचे रविवार दि. ८ मार्च रोजी पहाटे ३.४० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, पुतणे, पुतण्या नातवंडे असा परिवार आहे. यांच्या पार्थिवावर मेंहेंदूरी येथील प्रवरातीरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. बी. जी. बंगाळ म्हणजे वैचारिक स्पष्टता असलले मुलखावेगळं ध्येयवादी व्यक्तिमत्त्व होते. अकोले तालुक्यातील बहुजन समाजातील पहिले डॉक्टर अशी त्यांची ओळख होती. पूर्वीच्या काळी समर्पित भावनेने अकोले तालुक्यात त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात काम केले. अकोले तालुका एज्युकेशन संस्थेच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा होता. संस्थेवर काही काळ त्यांनी खजिनदार, सेक्रेटरी व विश्वस्त म्हणून काम केले. त्यांच्या निधनाने जुन्या पिढीतील सेवाभावी व मार्गदर्शक व्यक्तिमत्व हरपले अशी भावना वैद्यकीय क्षेत्रात व अकोले तालुक्यात व्यक्त होत आहे.

अगस्ती कारखान्याचे सेवानिवृत्त अधिकारी इंजि. सदानंद बंगाळ, नाशिक येथील प्राचार्य धनंजय बंगाळ, प्रवरानगर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ विद्याधर बंगाळ यांचे ते वडील होत. सेवानिवृत्त मुख्याध्यापिका अनिता बंगाळ यांचे ते सासरे होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्सपर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❋ कर्ज रक्कम वाढ । ❋ कर्ज व्याजदर कमी । ❋ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी लेडीज वेअर
सेलें नव्हे होलसेल सेल
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25